11 NOV 2021

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# बाबांच्या विचारांनी विद्यापीठ पुढे नेण्याचा निर्धार

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** 'प्रथम विद्यापीठ, मग आपण' या विचारांनी प्रभाकर तथा बाबा सावंत अखेरच्या श्वासापर्यंत कार्यरत राहिले. त्यांच्या विचारांनी शिवाजी विद्यापीठाला पुढे नेण्याचा निर्धार आजी-माजी कर्मचारी, अधिकारी, प्राध्यापक, विद्यार्थी यांनी बुधवारी केला. त्यांनी विद्यापीठातील राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात विद्यापीठ सेवक संघातर्फे आयोजित शोकसभेत बाबांच्या आठवणींना उजाळा देत, त्यांना आदरांजली वाहिली. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ.डी.टी. शिर्के होते.



**कोल्हापुरात बुधवारी शिवाजी विद्यापीठ सेवक संघातर्फे आयोजित शोकसभेत संघाचे अध्यक्ष बाबा सावंत यांना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी आदरांजली वाहिली. यावेळी शेजारी डावीकडून राम तुपे, पी. एस. पाटील, अजय देशमुख उपस्थित होते.**

बाबांचे अचानक जाणे वेदनादायी आहे. त्यांनी चर्चेतून कर्मचाऱ्यांचे प्रश्न सोडविले. त्यांच्या विचारांनी आपण सर्वजण कार्यरत राहून विद्यापीठाला पुढे नेणे हीच त्यांच्यासाठी मोठी आदरांजली ठरणार असल्याचे कुलगुरू डॉ.शिर्के यांनी सांगितले.

सर्वांशी बाबांचे समन्वयाचे संबंध होते. त्यांच्या निधनाने मोठी पोकळी निर्माण झाल्याची भावना प्र-कुलगुरू डॉ.पी.एस. पाटील यांनी व्यक्त केली. विद्यापीठ कर्मचाऱ्यांचे मार्गदर्शक हरपल्याचे कर्मचारी महासंघाचे अध्यक्ष अजय देशमुख यांनी सांगितले.

राज्यातील विद्यापीठ कर्मचाऱ्यांचे संयमी नेतृत्व हरपल्याची भावना डॉ.जे.एफ. पाटील यांनी व्यक्त केली.

अतुल एतावडेकर, डॉ.रूपा शहा, प्राचार्य टी.एस. पाटील, रमेश पोवार, राहुल चिकोडे, सुधाकर मानकर, डी.आर. मोरे, एस.जी. कुलकर्णी, अनिल घाटगे, वसंतराव मगदूम, प्रताप माने, लालासाहेब गायकवाड, जी.बी. कोळेकर, रणजीत शिंदे, आदींनी भावना व्यक्त केल्या. यावेळी बी.पी. साबळे, सुनील जाधव, अजय आयरेकर, सुरेखा आडके, वर्षा माने, संभाजीराव जगदाळे, प्रवीण कोडोलीकर, अनिल साळोखे, शफीक देसाई आदी उपस्थित होते. शोकप्रस्तावाचे कुलसचिव डॉ.विलास नांदवडेकर यांनी वाचन केले.

## संवर्धित बागेत स्मारक

संघाचे मार्गदर्शक व्ही.आर. पाटील आणि बाबांचे एकत्रित क्रांतिवनासारखे स्मारक संघाने संवर्धित केलेल्या बागेच्या परिसरात करण्यास प्रशासनाने परवानगी द्यावी, अशी मागणी विद्यापीठ कर्मचारी महासंघाचे महासचिव मिलिंद भोसले यांनी केली.

लोकमत

# विद्यापीठातील सैफ केंद्रामध्ये कार्यशाळा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील सोफिस्टिकटेड अनॅलिटिकल इन्स्ट्रुमेंट फॅसिलिटी (सैफ) केंद्रामध्ये एक्स-रे डीफ्रॅक्टो मीटर हे वैज्ञानिक उपकरण आहे. जास्तीत जास्त पदार्थ संशोधकांना या उपकरणाची आणि याद्वारे होणाऱ्या पृथ्थःकरण पद्धतींची तज्ज्ञांकडून माहिती व्हावी या हेतूने स्ट्राइड योजनेअंतर्गत आज, गुरुवारी आणि उद्या, शुक्रवारी कार्यशाळा होत आहे.

11 NOV 2021

जनसंपर्क कक्ष

लोकसत्ता शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कोल्हापुरात दिवाळीत फटाक्यांचा आवाज वाढला

लोकसता प्रतिनिधी

**कोल्हापूर :** गतवर्षीच्या तुलनेत यंदा दिवाळीतील फटाक्याचा आवाज वाढला आहे. लक्ष्मीपूजन व नरक चतुर्दशी एका दिवशी असल्याने घरगुती आणि व्यापाऱ्यांनी फटाके उडवले. आवाजाची पातळी पातळी केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मानांकनापेक्षा जास्त झाली आहे. शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरण विभागाने केलेल्या पाहणीचे निष्कर्ष मंगळवारी जाहीर करण्यात आले. प्रशासनाची फटाकेमुक्त दिवाळी ही संकल्पना हवेतच घेतल्याचे स्पष्ट झाले आहे.

गणेशोत्सव, दिवाळी या सणांच्या वेळी पर्यावरण विभागाकडून शहरातील विविध ठिकाणच्या आवाजाची पातळी मोजली जाते. यंदाही दिवाळीमध्ये निवासी, व्यापारी, औद्योगिक व शांत विभागात आवाजाची पातळी मोजण्यात आली. गतवर्षी करोना संसर्गामुळे दिवाळीची आवाजाची पातळी कमी होती. यंदाही हे चित्र केवळ शांत, औद्योगिक विभागात दिसून आले. उर्वरित भागात फटाक्यांच्या आवाजाने परिसर दणाणून गेला होता.

निवासी भाग असलेल्या राजाराम पुरी, शिवाजी पेठ, मंगळवार पेठ, नागाळा पार्क या सर्व ठिकाणी रात्री आवाजाची पातळी ४५ डेसिबलची अपेक्षा असताना ती सरासरी ६० डेसिबलच्या पुढे आढळली. व्यापारी भाग असलेल्या राजाराम पुरी, शाहू पुरी, लक्ष्मी पुरी, महाद्वार रोड, गंगावेश, बिंदू चौक येथे ६५ डेसिबलच्या पुढे आवाजाचा गोंगाट होता. तो ५५ डेसिबल अपेक्षित होता. पर्यावरण विभागाच्या प्रमुख प्रा. आसावरी जाधव व त्यांच्या पथकाने हे निष्कर्ष नोंदवले आहेत.

## फटाकेमुक्त दिवाळी कागदावर

दरम्यान, ग्रामीण भागात फटाकेमुक्त दिवाळी झाली पाहिजे असा प्रशासनाचा प्रयत्न होता. यासाठी शाळेतील विद्यार्थ्यांना शपथ घ्यायला लागली होती. प्रत्यक्षात अनेक गावांमध्ये जोरदार फटाक्यांची आतषबाजी झाली. त्यामुळे हा उपक्रम केवळ कागदावर असल्याचेच याहीवर्षी दिसून आले.

11 NOV 2021

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कर्मचारी संघाचा आधारवड हरपला

## बाबा सावंत यांना शोकसभेत विविध मान्यवरांची आदरांजली

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

बाबा सावंत यांच्या निधनाने शिवाजी विद्यापीठ कर्मचारी सेवक संघाचा आधारवड हरपला, अशा शब्दात विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी त्यांना आदरांजली वाहिली. शिवाजी विद्यापीठात शिवाजी विद्यापीठ सेवक संघाच्यावतीने या शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.

बाबा सावंत हे केवळ शिवाजी विद्यापीठ कर्मचाऱ्यांचेच नेतृत्व करत नव्हते; तर अन्य कर्मचारी संघटनांचे ते प्रेरणास्रोत होते, असे सांगून रमेश पोवार म्हणाले, व्ही. आर. पाटील यांच्या निधनानंतर सेवक संघासाठी अखेरच्या श्वासापर्यंत लढणाऱ्या बाबा सावंत यांच्या निधनाने मोठी पोकळी निर्माण झाली आहे.

महाराष्ट्र विद्यापीठ कर्मचारी महासंघाचे अध्यक्ष अजय देशमुख म्हणाले, शिवाजी विद्यापीठ सेवक संघाला राज्यभरात नावलौकिक मिळवून देण्याचे काम बाबा सावंत यांनी केले. कोणताही प्रश्न चर्चेतून सोडवता येतो, यासाठी प्रशासनाशी सलोख्याचे संबंध निर्माण करण्याची शिकवण बाबांनी दिली.



**कोल्हापूर : बाबा सावंत यांच्या निधनानिमित्त आयोजित शोकसभेत बोलताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. शेजारी राम तुपे, डॉ. पी. एस. पाटील, अजय देशमुख. (छाया : पप्पू अत्तार)**

माजी बीसीयुडी संचालक डी. आर. मोरे म्हणाले, विद्यापीठ विकास आघाडी स्थापन करण्यात बाबांचे मोलाचे योगदान होते. सेवक संघाचे अध्यक्षपद भूषवताना कधीही विद्यापीठाच्या प्रतिमेला गालबोट लागेल, असे काम त्यांनी केले नाही. सिनेट सदस्य भैया माने म्हणाले, ग्रामीण भागात महाविद्यालय उभारणीसाठी बाबा सावंत यांनी विशेष प्रयत्न केले. कर्मचारी संघटनेचा ते आधारस्तंभ होते.

डॉ. जे. एफ. पाटील यांनी विद्यापीठातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांमध्ये सलोख्याचे संबंध निर्माण करण्याचा प्रयत्न बाबांनी केल्याचे सांगितले. डॉ. प्रवीण कोडोलीकर यांनी भविष्यात सेवक संघाने बाबा सावंत यांच्या विचारांप्रमाणे वाटचाल करणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल, असे सांगितले.

शिवाजी विद्यापीठ कर्मचारी संघाचे वसंतराव मगदूम यांनी संघटना जरी वेगळ्या असल्या तरी कर्मचारी हिताला बाबा प्राधान्य देत होते. त्यांच्या निधनाने एक लढवय्ये नेतृत्व हरपले आहे, असे सांगितले.

शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील म्हणाले, केवळ विद्यापीठ कर्मचारीच नाही; तर ज्येष्ठ नागरिक, अन्य सामाजिक कार्यातही बाबांचे योगदान होते. समाजसेवेचा वसा त्यांनी शेवटपर्यंत कायम ठेवला.

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, स्वत: बाबा विद्यापीठात काम करत होते. कनिष्ठ लेखनिक पदापासून ते सहायक कुलसचिव म्हणून ते निवृत्त झाले. कर्मचाऱ्यांचे प्रश्न कसे सोडवायचे याचे कसब त्यांच्याकडे होते. कर्मचारी विविध मागण्यांसाठी आंदोलन करत, पण विद्यापीठाच्या हिताचा विचार येईल तेव्हा कर्मचाऱ्यांना सबुरीचा सल्ला देत. विद्यापीठ प्रथम मग आपण, असे ते सांगत होते. आज विद्यापीठाचा जो शैक्षणिक डोलारा उभा आहे, त्यात बाबा सावंत यांचे योगदान मोलाचे आहे.

कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी शोकसभेचे वाचन केले. यावेळी प्रा. सुधाकर मानकर, प्राचार्य टी. एस. पाटील, अतुल ऐतवडेकर, महापालिका कर्मचारी संघाचे अध्यक्ष संजय भोसले, मधुकर पाटील, डॉ. रूपा शहा, शिरीष देशपांडे, भाजपचे राहुल चिकोडे, मिलिंद भोसले आदींनी भावना व्यक्त केल्या.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठात आज, उद्या कार्यशाळेचे आयोजन

**कोल्हापूर :** केंद्र सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभाग (डीएसटी) यांच्या अंतर्गत शिवाजी विद्यापीठातील स्थापन केलेल्या (सोफिस्टिकेटेड ॲनॅलिटिकल इन्स्ट्रूमेंट फॅसिलिटी) सैफ केंद्रामध्ये एक्स-रे डिफ्रॅक्टोमीटर हे वैज्ञानिक उपकरण मागील वर्षी घेण्यात आले आहे. पदार्थ संशोधकांना या उपकरणाची माहिती व्हावी, या हेतूने विद्यापीठाकडून स्ट्राईड योजनेंतर्गत ११ व १२ नोव्हेंबरदरम्यान दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन केले आहे. कार्यशाळेचे उद्घाटन गुरुवारी सकाळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते होणार आहे. या उपकरणाचा उपयोग स्फटिकीय पदार्थांच्या अंतर्गत संरचना समजून घेण्यासाठी केला जातो. ब्रुकर (जर्मनी) या कंपनीचे ॲप्लिकेशन इंजिनिअर डॉ. रविकुमार, रसायनशास्त्र अधिविभागातील डॉ. डी. एस. भांगे व भौतिकशास्त्र अधिविभागातील प्रा. आर. जी. सोनकावडे यांचे मार्गदर्शन लाभणार आहे.

पुढारी

# सहायक प्राध्यापकांची २ हजार ८८, प्राचार्यांची ३७० रिक्त पदे भरणार

**मुंबई :** मान्यताप्राप्त अशासकीय अनुदानित महाविद्यालयांमधील ३७० प्राचार्य व २ हजार ८८ सहायक प्राध्यापकांची रिक्त पदे भरण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे, अशी माहिती उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी दिली. उच्च शिक्षण विभागांतर्गत प्राचार्य, शिक्षक व शिक्षकेतर पदांपैकी राज्याच्या उच्चस्तरीय सचिव समितीने एकूण ४ हजार ७३८ पदांना मान्यता दिली होती. त्यापैकी १ हजार ६७४ पदे भरण्यात आली. कोरोनामुळे दीड ते दोन वर्षांपासून भरतीवर राज्य शासनाने निर्बंध घातले होते. आजपर्यंतच्या ३७० प्राचार्यांची १०० टक्के रिक्त पदे भरण्यास मान्यता दिली आहे. त्याबाबतची भरती प्रक्रिया सुरू झाली आहे.

11 NOV 2021 पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# बाबा सावंत यांचे स्मारक व्हावे

## शोकसभेमध्ये सूर, मान्यवरांनी वाहिली आदरांजली

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

दिवंगत पी. ए. तथा बाबा सावंत यांनी नेहमीच शिवाजी विद्यापीठ या मातृसंस्थेचा विचार केला. त्यामुळे त्यांच्या स्मृती जपणारे स्मारक विद्यापीठाच्या परिसरात निर्माण करण्यात यावे, व्ही. आर. पाटील व बाबा सावंत यांच्या स्मृती तेथे जपल्या जाव्यात, असा सूर शिवाजी विद्यापीठ सेवक संघातर्फे दिवंगत बाबा सावंत यांना आदरांजली वाहण्यासाठी राजमाता जिजाऊ बहुउद्देशीय सभागृहामध्ये आयोजित शोकसभेमध्ये उमटला. विविध क्षेत्रातील मान्यवरांनी बाबा सावंत यांना आदरांजली वाहिली. यावेळी अनेकांना अश्रू अनावर झाले.

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, बाबा सावंत यांनी कर्मचाऱ्यांची बाजू घेताना अनेक वेळा संघर्षाचे प्रसंग आले; मात्र त्यांनी नेहमीच चर्चेचा मार्ग स्वीकारला. शिवाजी विद्यापीठाच्या हिताला बाधा येईल अशी कोणतीही गोष्ट न करण्याचा त्यांचा दंडक होता. तो त्यांनी नेहमी पाळला.

प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील म्हणाले, कर्मचाऱ्यांचे नेतृत्व करीत असतानाही त्यांचे सर्वांशी सलोख्याचे संबंध होते. त्यांच्याकडून खूप काही शिकायला मिळाले. आपल्या हयातीत विद्यापीठास बाधक अशी कोणतीही गोष्ट केली नाही.

भैया माने म्हणाले, लोकांना घडवण्याचे काम बाबा सावंत यांनी केले. ग्रामीण भागातील मुलींना शिक्षण मिळावे, यासाठी त्यांची विशेष तळमळ होती. राहुल चिकोडे म्हणाले, एखाद्या कर्मयोग्याप्रमाणे त्यांचे काम होते. त्यांचा वारसा त्यांची पुढची पिढी चालवत आहे.

अर्थतज्ज्ञ डॉ. जे. एफ. पाटील म्हणाले, ज्या काळात चळवळी संपत चालल्या आहेत, त्या काळात बाबांनी चळवळ चालवत कामगारांना न्याय मिळवून दिला. कर्मचारी, प्रशासन, नागरिक, राज्य शासन, इतर विद्यापीठे यांच्याशी त्यांचा नेहमीच सलोखा राहिला.

शोकसभेस महाराष्ट्र विद्यापीठ कर्मचारी महासंघाचे अध्यक्ष अजय देशमुख, राम तुपे, विद्यापीठ महासंघाचे प्रतिनिधी अतुल ऐतवडेकर यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रा. जी. बी. कोळेकर, डॉ. सागर डेळेकर, डॉ. रूपा शहा, लालासो गायकवाड, डॉ. सुधाकर मानकर, प्राचार्य डॉ. टी. एस. पाटील, श्रीकांत अडिवरेकर, शिरीष देशपांडे, अजित इंगळे, आनंद खामकर, डॉ. संजय कुबल, वसंत मगदूम, अनिल घाडगे, डॉ. प्रवीण कोडोलीकर, संजय भोसले यांनी मनोगत व्यक्त केले.

11 NOV 202;

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# बाबांमुळे विद्यापीठाचा लौकिक

## शोकसभेतील सूर ; शैक्षणिक, सामाजिक, राजकीय क्षेत्रांतील मान्यवरांची आदरांजली

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १० : सेवक संघाचे नेतृत्व करताना बाबा सावंत यांनी विद्यापीठाच्या लौकिकाला बाधा येणार नाही, हाच प्रयत्न केला. भविष्यातही सेवक संघाने प्रशासनासोबत समन्वयाने प्रश्न सोडवणेहीच त्यांना श्रद्धांजली ठरेल, अशा भावना विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी शोकसभेत व्यक्त केल्या. शिवाजी विद्यापीठातील राजमाता जिजामाता सभागृहात आज ही शोकसभा झाली. शिवाजी विद्यापीठ क्षेत्रातील कर्मचारी, प्राध्यापक, अधिकारी, त्याचप्रमाणे सामाजिक कार्यकर्ते या सभेस उपस्थित होते.

यावेळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, "बाबा सावंत यांनी




**कोल्हापूर : सेवक संघाचे अध्यक्ष बाबा सावंत यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी आयोजित शोकसभेत बोलताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, अजय देशमुख.**

सांगितलेली शिस्त, आपुलकी आणि संयम ही तत्त्वे आचरणात आणणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल."

प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील म्हणाले, "बाबा सावंत यांनी प्रत्येक घटकांशी समन्वय ठेवला. विद्यापीठ प्रथम नंतर कर्मचारी, अधिकारी अशा भूमिकेतून नेतृत्व केले." महाराष्ट्र विद्यापीठ महासंघाचे अध्यक्ष अजय देशमुख यांनी बाबा सावंत म्हणजे चालते-बोलते विद्यापीठ होते. अशा पितृतुल्य व्यक्तिमत्त्वाने पाठीवर ठेवलेला हात नेहमीच प्रेरणा देत राहिला. संघटनात्मक उणीव भरून निघेल, परंतु ही उणीव कधीही भरून निघणार नाही, अशा शब्दात आदरांजली वाहिली.

डॉ. सुधाकर मानकर म्हणाले, "प्रश्न सोडवताना कटुता येणार नाही अशी कार्यशैली सावंत यांनी अवलंबली होती. आंदोलनांमध्ये आक्रमकता असली तरी चर्चेवेळी संयम ठेवला."

ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ प्रा. डॉ. जे. एफ. पाटील म्हणाले, "व्यवस्थापन आणि संघटना यांच्यात सलोखा ठेवण्याचे काम बाबांनी केले. प्राध्यापक आणि सेवक एका विचाराने काम करतात, हे केवळ बाबा सावंत यांच्यामुळे शक्य झाले आहे." मिलिंद भोसले यांनी सेवक संघाच्या जागेवर व्ही. आर. पाटील आणि बाबा सावंत यांचे स्मारक व्हावे, अशी मागणी केली. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी बाबांच्या जाण्याने केवळ सेवक संघाचे नेतृत्व नाही, तर विद्यापीठातील कर्मचाऱ्यांचे पितृत्व हरपले आहे, अशा शब्दांमध्ये श्रद्धांजली वाहण्यात आली.

यावेळी विजय देवणे, माजी कुलसचिव बी. पी. साबळे, प्राचार्य टी. एस. पाटील, संजय भोसले, प्रा. डॉ. रूपा शहा, वसंत मगदूम, डॉ. संजय कुबल, शिरीष देशपांडे, श्रीकांत आडिवरेकर, प्रा. मधुकर पाटील, राहुल चिकोडे, अनिल घाटगे, लाला गायकवाड, डॉ. प्रवीण कोडोलीकर, प्रा. जी. बी. कोळेकर, अजित इंगळे हे उपस्थित होते.

### कर्मचारी गहिवरले...

बाबा सावंत यांचा अमृतमहोत्सवी सत्कार याच सभागृहात काही वर्षांपूर्वी झाला होता. त्याच ठिकाणी शोकसभा घेण्याची वेळ आली, या आठवणीने अनेक कर्मचाऱ्यांना गहिवरून आले. बाबा ८० व्या वर्षातही सक्रिय होते. काही कर्मचाऱ्यांना बाबांनी दिवाळी शुभेच्छा दिल्या होत्या. त्या आठवणीने काहीजण बोलताना भावनावश झाल्याने सभागृह काही क्षण स्तब्ध झाले.

सकाळ

# पंधरा नोव्हेंबरपासून महाविद्यालये सुरू होणार

**मुंबई :** राज्यातील विद्यापीठे आणि वरिष्ठ महाविद्यालये १५ नोव्हेंबरपासून ऑफलाइन सुरू होतील. यासाठी अनेक महाविद्यालयांनी शिक्षक आणि कर्मचारी यांच्या लसीकरणाचा तपशील मागविला आहे. सुमारे ९० टक्के शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे लसीकरण पूर्ण झाल्याचे महाविद्यालयांकडून सांगण्यात आले.

11 NOV 2021

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाच्या प्रगतीत बाबा सावंत यांचे योगदान मोलाचे

## शिवाजी विद्यापीठ सेवक संघाच्यावतीने श्रध्दांजली सभेचे आयोजन : सभेत मान्यवरांनी व्यक्त केल्या भावना

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या स्थापनेपासून ते जागतिक पातळीवरील यशापर्यंतचे बाबा सावंत हे साक्षीदार होते. कर्मचाऱ्यांच्या प्रश्नासाठी आंदोलन करताना विद्यापीठाच्या लौकिकाला कोठेही बाधा येणार नाही, याची ते काळजी घेत. विद्यापीठापेक्षा कोणीही मोठा नाही, अशीच त्यांची भूमिका होती. त्यामुळे सेवक संघातील सदस्यांनी त्यांच्या विचाराचे आचरण करणे हीच त्यांन खरी श्रध्दांजली ठरणार आहे, अशा भावना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्यासह मान्यवरांनी व्यक्त केल्या.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ सेवक संघाच्या वतीने विद्यापीठातील आयोजित बाबा सावंत श्रध्दांजली सभेत भावना व्यक्त करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत विद्यापीठ अधिकारी, कर्मचारी.

विद्यापीठ सेवक संघाच्यावतीने विद्यापीठातील राजमाता जिजाऊ बहुउद्देशीय सभागृहात श्रद्धांजली सभेचे आयोजन केले होते. यावेळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते प्रभाकर ऊर्फ बाबा सावंत यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून श्रध्दांजली वाहण्यात आली.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, कर्मचारीच नव्हे तर विद्यापीठ प्रशासन, संस्था, महाविद्यालय, प्राध्यापक, विद्यार्थ्यांच्या प्रश्नावरही ते मोठ्या कौशल्याने तोडगा काढत होते. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील म्हणाले, जागतिक क्रमवारीत माझ्या संशोधनाचा समावेश झाल्यानंतर त्यांनी मला मानाचा फेटा बांधला. त्यांची शाब्बासकीची थाप माझ्यासाठी प्रेरणादायी होती. डॉ. जे. एफ. पाटील म्हणाले, बाबांच्या प्रयत्नामुळे विद्यापीठातील सर्व अस्थापना व्यवस्थित चालत होत्या. त्यांचे नेतृत्व राज्यपातळीवरील होते. महाराष्ट्र विद्यापीठ कर्मचारी संघाचे अध्यक्ष अजय देशमुख म्हणाले, शिवाजी विद्यापीठच नव्हे तर राज्यभरातील विद्यापीठांचे नेतृत्व ते करीत होते. त्यांच्या जाण्याने कर्मचाऱ्यांचा नेता हरपला. माजी बीसीयुडीचे डायरेक्टर डॉ. डी. आर. मोरे, सिनेट सदस्य प्रताप ऊर्फ भैया माने, भाजप जिल्हाध्यक्ष राहुल चिकोडे, शंकरराव कुलकर्णी, अनिल घाटगे, शिवाजीराव मगदूम, संजय भोसले, डॉ. संजय कुबल, डॉ. प्रवीण कोडोलीकर, आनंद खामकर, शिरीष देशपांडे, श्रीकांत अडिवरेकर, डॉ. रूपा शहा, प्राचार्य डॉ. टी. एस पाटील, सुधाकर मानकर, डॉ. जे. व्ही. कोळेकर, गिरीश कुलकर्णी, अतुल ऐतावडेकर, लालासाहेब गायकवाड यांनी मनोगत व्यक्त केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी शोक प्रस्तावाचे वाचन केले. माजी खासदार प्रा. संजय मंडलिक, एसएनडीटी कॉलेज कर्मचारी संघ, पुणे विद्यापीठ कर्मचारी संघ यांनी शोकसंदेश पाठवला आहे. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख विजय देवणे, माजी कुलसचिव बी. पी. साबळे, डॉ. नमिता खोत, डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. अलोक जत्राटकर यांच्यासह शिक्षक, कर्मचारी उपस्थित होते.

तरुण भारत

# विद्यापीठात आज एक्सआरडी विषयावर कार्यशाळा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील विज्ञान व तंत्रज्ञान विभागाच्या अंतर्गत स्थापन केलेल्या सोफिस्टिकटेड अनॅलिटिकल इन्स्ट्रूमेंट फॅसिलिटी केंद्रामध्ये एक्स-रे डीफ्रॅक्टोमीटर हे उपकरण घेतले आहे. त्याची माहिती होण्यासाठी स्ट्राइड योजनेअंतर्गत ११ व १२ दरम्यान कार्यशाळेचे आयोजन केले आहे. या कार्यशाळेत ब्रूकर (जर्मनी) या कंपनीचे ॲप्लिकेशन इंजिनियर डॉ. रविकुमार, रसायनशास्त्र अधिविभागातील डॉ. डी. एस. भांगे व भौतिकशास्त्र अधिविभागातील प्रा. आर. जी. सोनकावडे मार्गदर्शन करणार आहेत. कार्यशाळेचे उद्घाटन दि. ११ रोजी सकाळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते होणार आहे.

तरुण भारत

# प्राध्यापक-प्राचार्य रिक्त पदे भरण्यचा मार्ग खुला

मुंबई : अशासकीय अनुदानित महाविद्यालयांमधील ३७० प्राचार्य व २०८८ सहाय्यक प्राध्यापक या संवर्गातील रिक्त पदे भरण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला असल्याची माहिती उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत यांनी बुधवारी दिली. उच्च शिक्षण विभागांतील प्राचार्य, शिक्षक व शिक्षकेतर पदांपैकी राज्याच्या उच्चस्तरीय सचिव समितीने एकूण ४७३८ पदांना मान्यता दिली होती. यातील १६७४ पदे आजतागायत भरण्यात आली. कोरोना संसर्गात गेल्या दीड ते दोन वर्षापासून या भरतीवर निर्बंध घातले होते. आता मात्र भरती प्रक्रिया सुरु झाली असल्याचे सामंत यांनी सांगितले. १ ऑक्टोबर २०२० च्या विद्यार्थ्यांच्या संख्येच्या आधारे विभागाने सहाय्यक प्राध्यापकांची पदे भरण्याचा प्रस्ताव वित्त विभागाकडे सादर केला होता. परंतु २०८८ पदे भरण्यास मान्यता देण्यात आली आहे.

Times of India

# Diwali crackers break noise norms, louder than 2019 too

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The recent Diwali festival was noisier than last year in Kolhapur city, while some locations have reported a steady rise in noise levels over the years, shows the data collected by Shivaji University, Kolhapur.

A team of environmental science department led by head of department Asawari Jadhav collected the data of noise levels at 22 locations — four in silent zone, six in residential zone, ten in commercial zone and two in industrial zone. The maximum limit of decibel fixed for each zone by Central Pollution Control Board is — 40, 45, 55 and 70, respectively.

The team collected the data on noise levels at night and in early morning hours, when firecrackers are burst. According to the findings, except for two industrial locations (Udyam Nagar and Y P Powar Nagar), the decibel levels remained much higher than the permitted levels at 20 locations in the city.

File photo



The team collected the data on noise levels at night and in early morning hours

Also, the noise levels in residential and commercial zones surpassed the levels recorded last year. For instance Papachi Tickti, a location from commercial zone which recorded 68.78 dB last Diwali, recorded 72.78 dB this Diwali. The noise level at Papachi Tickti recorded was highest in the city. The locality is a major trading place located in the vicinity of Mahalaxmi temple and famous Kolhapuri Chhapal Lane.

Jadhav said, "Last year, due to the Covid situation, there was a check on the celebrations. This time, there was no check and the markets were abuzz. Also, this time, Lakshmi Pujan and Narak Chaturdashi fell on the same day and therefore the crackers were burnt in large numbers on the same day."

Among residential areas, Shivaji Peth location recorded highest 66.01 dB noise level. In 2020, the noise levels here were 58.68 decibels, while in 2019, it was 55.56 decibels. It is one of the old city areas. The relatives, who usually work in Mumbai and Pune, arrived in Kolhapur this year to celebrate the festival with near and dear ones.

Interestingly in silent zones, the noise levels this time went down in comparison to last year's Diwali. The locations from silent zones where the noise levels measured are- CPR Hospital, Collectors Office, District Court and Shivaji University.

Last year, decibel recorded at Collectors Office was 56.37 dB, which came down to 56.26 dB this year. Shivaji University recorded least noise level of 49.71 dB in the city, though it was higher than the permissible limit.